नियमित दिवाणी दावा कं ८६/२०१६
सुनंदा जगताप व इतर
विरुध्द
बबन पांगारे व इतर

# निशाणी कमांक ५ खालील आदेश
# (पारित दि.२४/०६/२०१९)

अर्ज व त्या सोबत दिलेले शपथपत्र वाचले. त्या सोबत जोडलेल्या कागदपत्राचे अवलोकन केले. वादी तर्फे विधिज्ञ श्री.पी.व्ही.देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं.१ व २ हे विधिज्ञामार्फत प्रकरणामध्ये हजर झाले आहेत. परंतु त्यांनी या अर्जास म्हणणे दिलेले नाही. तसेच त्यांनी या अर्जाबाबत युक्तीवादही केलेला नाही. वादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवादामध्ये सांगितले की, प्रतिवादी नं १ व २ यांनी या दाव्याचा निकाल होई पर्यंत वाद जमीनीची विक्री, गहाण अथवा कोणत्याही प्रकारे तबदीली करु नये. असा अंतरीम मनाई हुकुम देण्यात यावा. मुळ दाव्याचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा दिनांक ३०/११/२००९ रोजीचे वादातील खरेदीखत वादीवर बंधनकारक नाही असे जाहीर होउन मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकुम बाबत आहे. वाद खरेदीखताचे अवलोकन केले असता त्यानुसार साधारण ३ हेक्टर पेक्षा जास्त जमीनीचे खरेदीखत झाल्याचे दिसुन येते. खरेदीखतामध्ये ४ बहिणींना म्हणजेच वादी नं १ व इतर तीन यांना धनादेशाव्दारे रक्कम रु.७०,०००/— दि.३०/११/२००९ रोजी दिल्याचे नमुद आहे व खरेदीखतास मान्यता देणार तानाजी दादासाहेब जगताप म्हणजेच प्रतिवादी नं ३ यांना रक्कम रु.३४,३७५/— रोख दिल्याचे नमुद आहे. परंतु प्रतिवादी नं १ व २ यांनी कागदपत्राची यादी नि.क्र २७ व्दारे प्रतिवादी नं १ यांच्या बचतखात्याच्या उता—याचे अवलोकन केले असता, मान्यता देणा—या पैकी तीन व्यक्तींनाच धनादेशाव्दारे रु.७०,०००/— दिल्याचे दिसुन येते. परंतु प्रतिवादी नं. ३ यांना सदर उता—यावरुन रु.

३,००,०००/— धनादेशाव्दारे दिल्याचे दिसुन येते. वादी हे वाद मिळकतीमध्ये त्यांचा हिस्सा वडिलोपार्जित मिळकत म्हणुन सांगत आहेत. वादीने कथन केल्याप्रमाणे नातेसंबध नाकारण्यात यावा याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा समोर आलेला नाही. तसेच वाद मिळकतीचे स्वरुप हे अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे नाही, याबाबत कोणताही पुरावा सकृतदर्शनी अभिलेखावर नाही. दाव्याचे स्वरुप, मिळकतीचे स्वरुप व वादीचे नातेसंबध पाहता वाद मिळकतीशी वादीचा हक्क संबध असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येते. प्रतिवादी नं १ व २ यांनी वाद मिळकतीची विक्री, गहाण अथवा बोजा निर्माण केल्यास गुंतागुंत वाढुन अंतिम न्यायनिर्णयास विलंब होणार आहे. वादीस सकृत दर्शनी बाजु असुन न्यायाचा समतोलही वादीच्या बाजुनी आहे. अंतरिम मनाई हुकुम न दिल्यास प्रतिवादी पेक्षा वादीचे जास्त नुकसान होणार आहे. सबब पुढील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी नं १ व २ यांनी पुढील आदेशापर्यंत अर्जातील नमुद मिळकतीची विक्री,गहाण, दान, बोजा व अन्य तत्वावर तबदील करु नये असा अंतरिम मनाई हुकुम देण्यात येतो.

२. अर्जाचा खर्च दाव्यात सामाविष्ट.

(स.का.मुळे)

दि.२४/०६/२०१९ दिवाणी न्यायाधीश, भोर

**“I affirm that the contents of this P.D.F file Oder are same word for word as per original Order.**
**Name of the Steno : Shri V.G. Fulari**
**Court Name : Shri. S.K.Mule**
**CJJD., Bhor, Dist. Pune.**
**Date : 24.06.2019.**
**Order signed by presiding officer on :24.06.2019.**
**Order uploaded on : 25.06.2019.**

CNRNo.MHPU120007242016